**प्रेसनोट** दिनांक १०/०९/२०२०

**तलाठी सज्जा मेंढका ता. मुदखेड जि.नांदेड येथील तलाठी रमेश गड्डपोड यांना २,५००/— रुपये लाचेचच्या रक्कमेस रंगेहात नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले**

दिनांक १०/०९/२०२० रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, "यातील लोकसेवक रमेश गड्डपोड हे तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमीनीचा फेरफार करून ७/१२ देण्यासाठी ३,०००/— रू. लाचेची मागणी करीत आहेत".

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक १०/०९/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक गड्डपोड यांनी तक्रारदार यांचेकडे उपरोक्त कारणासाठी ३,०००/— रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,५००/— रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आजच दिनांक १०/०९/२०२० रोजी लोकसेवक गड्डपोड यांचे खाजगी कार्यालय कृष्णानगर मुदखेड परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये लोकसेवक गड्डपोड यांनी तक्रारदार यांचेकडुन २,५००/— रू. लाचेची रक्कम स्विकाल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन रमेश मारोती गड्डपोड, वय ३२ वर्ष तलाठी सज्जा मेंढका ता. मुदखेड जि. नांदेड रा. व्यंकटेशनगर मुदखेड मुळ रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड यांचे विरूध्द पोलीस स्टेशन मुदखेड जि. नांदेड येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक, शेषराव नितनवरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उप अधिक्षक श्री विजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शेषराव नितनवरे, पोना हनमंत बोरकर, किशन चिंतोरे, अमरजितसिंह चौधरी, अनिल कदम यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिति असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रंमाक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रंमाक ०२४६२—२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रंमाक ८९७५७६९११८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

ला.प्र.वि.नांदेड,युनिट

( राहुल पखाले )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

मा.संपादक, दैनिक ..........................................,

कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर प्रेसनोट प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner